# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जि.रायगड

**कार्यालय** :- आयुक्त मुख्यालय, २ रा मजला,
पनवेल - ४१० २०६ दूरध्वनी क्र. 022-27458040/41/42
Email Id : panvelcorporation@gmail.com


जा.क्र.पमपा/घकवि/२५२२/प्र.क्र.११९/५५८/२०२२ दिनांक :- ३८/०८/२०२२

## स्वारस्य अभिव्यक्ती

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील निर्माण होणा-या ई- वेस्टची घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०१६ नूसार बाह्य यंत्रणेद्वारे कचरा उचलून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणेकामी तातडीने इच्छुक स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) मागवित आहोत.

इच्छुक स्वारस्य अभिव्यक्तींनी त्यांच्या संस्थेचे नाव महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात दिनांक -०२/०९/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर तारखे नंतर आलेली स्वारस्य अभिव्यक्ती विचारात घेतली जाणार नाहीत.

**अटी व शर्ती:-**

१) संस्था/एजन्सीची सक्षम प्राधिकरणाकडे नोंद झालेली असावी. (उदा. दुकान आस्थापना, धर्मादाय आयुक्त इ.)

२) संस्था/एजन्सीकडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ/ सक्षम प्राधिकरण यांच्याकडील ई-वेस्ट हाताळणीबाबतचे परवाना पत्र असावे.

३) संस्था/एजन्सीने सदर कामाच्या संचालनाबाबतची Concent of operation सादर करणे आवश्यक.

४) संस्था/एजन्सीचे पॅन व जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.

५) पनवेल महानगरपालिका क्षेत्रात तयार होणाऱ्या ई- वेस्टचा कचरा उचलणे /वाहतुक करणे व त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे, कचरा उचलण्याची जागा निश्चित करणे, आवश्यक ती यंत्रसामुग्री /मनुष्यबळ/तंत्रज्ञान पुरविणे/उभारणे/कार्यान्वित करणे इत्यादीचा करारनामा करुन इच्छुक संस्थेस वरील विषयाबाबत कामे चालु करण्याची अनुमती देण्यात येईल. तसेच सदरबाबतची कोणतीही तक्रार सदर संस्थेच्या स्तरावर निकाली काढणे अपेक्षीत असून पनवेल महानगरपालिकेचा यामध्ये काहीही सहभाग नसेल. नागरीकांकडून अथवा पनवेल महानगरपालिकेच्या पदाधिका-यांकडून तक्रार प्राप्त झाल्यास व सदर तक्रारीमधे तथ्य आढळल्यास सदर संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल.

६) सदर संस्थेमार्फत चालवित असलेल्या कचरा प्रक्रीया केंद्राचा अहवाल घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०१६ अंतर्गत वेळोवेळी मागणी केलेनुसार महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक राहील.

७) घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०१६, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मापदंडानुसार वाहतुक करणे व त्यावर प्रक्रिया/विल्हेवाट लावण्यासंबंधीच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करणेची जबाबदारी संस्थेची राहील.

८) संस्थेमार्फत वाहून नेत असलेला ई- वेस्टचा अहवाल ठेवून मागणी केल्यावर सदर अहवाल महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक राहील.

९) संस्थेने महानगरपालिकेच्या २० वार्ड मध्ये आठवड्यातून किमान एक वेळ ई- वेस्ट संकलन व वाहतूक करणेकामी वाहन व्यवस्था व मनुष्यबळ स्वखर्चाने पुरविणे बंधनकारक राहिल.

१०) संस्थेमार्फत ई- वेस्ट संकलन व वाहतूक करणा-या वाहनांना जी.पी.एस. यंत्रणा बसविणे व सदर वाहनांचा मासिक अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

११) संस्थेमार्फत वाहून नेत असलेला ई- वेस्टवर करण्यात येणा-या प्रक्रीयेची standard operating procedure (SOP) सादर करणे आवश्यक.

१२) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर संबंधित संस्थेने नियमाप्रमाणे काम करने बंधनकारक राहील. सदर कामासाठी महानगरपालिका अथवा नागरीकांकडून कोणतेही फी/शुल्क देय असणार नाही.

१३) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर संबंधित संस्थेने आठवड्यातील एक दिवस (उदा. रविवार) महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रभागांमध्ये घंटागाडीद्वारे ई- वेस्ट गोळा करणे बंधनकारक राहील.

१४) स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणा-या संस्था स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना राहतील.

१५) संस्था/एजन्सीने शासकीय संस्थेत ई-वेस्ट उचलने व विल्हेवाट लावणेबाबत काम केलेले असावे.

१६) संस्था/एजन्सी मार्फत मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न प्रमाणपत्र व सनदी लेखापाल (C.A) यांचेकडुन प्रमाणित मागील तीन वर्षाची सरासरी वार्षीक उलाढ़ाल कमीत कमी ५ लक्ष असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

१७) सदर कामाशी संबंधित सर्व शासकीय कायदे व नियम पाळण्याची जबाबदारी संस्था/एजन्सी ची असेल.

१८) सुरक्षीततेच्या दृष्टीने उपाययोजना संस्था/एजन्सी मार्फत करावी. कोणतीही अपघटना घडल्यास त्यास सदर संस्था/एजन्सी जबाबदार राहील.

१९) संस्था/एजन्सीने गोळा केलेल्या ई-वेस्ट मधील घातक कच-याची (hazardous waste) ची विल्हेवाट घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २०१६ नूसार लावणे बंधनकारक राहील.

( सचिन पवार )
उप आयुक्त (आरोग्य)
पनवेल महानगरपालिका

PANVEL MUNICIPAL CORPORATION
PANVEL-RAIGAD